




Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com








वर्ष ३ रे अंक : ८०५ वा सोमवार दि. १७ जून २०२४ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये


# अवैध सावकार कृपलानीकडे सापडले प्रचंड घबाड...

## अवैध सावकारीतून बळकावल्या होत्या कर्जदारांच्या संपत्ती

**जनसंचलन/बुलढाणा**

अकोला येथील अवैध सावकार आणि लोकांच्या संपत्ती पठाणी वसुलीने बळकावणारा मनोहर अडीतमल कृपलानी व दिनेश मनोहर कृपलानी याच्याकडे लोकांच्या बळकावलेल्या संपत्तीचे प्रचंड घबाड सापडले असून, यातून हे सिद्ध होते की, कृपलानी याने अवैध सावकारीच्या धंद्यातून अनेकांना प्रचंड लुबाडण्याचे काम केलेले आहे. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने सर्वप्रथम अकोला येथील अवैध सावकार कृपलानी याच्या नालायक कृत्यांचा भंडाफोड केला होता. अवैध सावकारीच्या विरोधात दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने जी वृत्तमालिका चालवली होती, त्याला या माध्यमातून एकप्रकारे दुजोरा मिळाला आहे. अकोला येथील सिंधी कॅम्प भागात राहणारा मनोहर अडीतमल कृपलानी व दिनेश मनोहर कृपलानी हे गेल्या अनेक वर्षांपासून अवैध सावकारीचा व्यवसाय करीत आहे. लोकांना अव्वाच्या सव्वा दराने पैसे देत होते. पैसे देताना अनेकांकडून कोरे चेक, कोरे बाँड किंवा त्यांच्या संपत्तीची कागदपत्रे घेत होता. त्यानंतर कर्जदारांच्या मागे पैशांचा तगादा लावयचा, कर्जदारांकडून प्रचंड प्रमाणात व्याजाची

### सिटी न्यूज दै. जनसंचलनचा दणका

वसुली करायचा. कधी-कधी तर व्याजाची रक्कम ही मुद्दलापेक्षाही अधिक असायची, कर्जदार कर्ज भरण्यास सक्षम नसला, तर त्याला कृपलानी व त्याचे लोक प्रचंड मानसिक त्रास देण्याचे काम करायचे. कृपलानी हा कर्जदारांकडून अत्यंत बेदरकारपणे व बेशरमपणे पैशांची वसुली करायचा. मनोहर अडीतमल कृपलानी व दिनेश मनोहर कृपलानी याच्या या कृष्णकृत्यांची माहिती सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनला प्राप्त झाल्यानंतर त्यासंदर्भात आम्ही सविस्तर वृत्तमालिका प्रकाशित केली. तसेच जिल्हा उपनिबंधक अकोला यांच्याकडेही पाठपुरावा केला होता.या वृत्तमालिकेचा व पाठपुराव्याचा परिणाम झाला. त्यानुसार दि. २७ मार्च २०२४ रोजी मनोहर अडीतमल कृपलानी याच्या घर-ावर सकाळी ५ वाजता जवळपास ८ ते ९ पथक घेऊन जिल्हा उपनिबंधकच्या मार्गदर्शनाखाली अधिकाऱ्यांनी छापा टाकला. ही कारवाई महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे

### नाव मोठे दर्शन खोटे...

**या अवैध सावकारी प्रकरणात खोलवर जाऊन आम्ही पूर्ण पाठपुरावा केला असून पुढील सत्रात अकोला येथील एका नामांकित कंपनीचा मोठा डीलर अवैध सावकार कृपलानी यांचे खरे चेहरे जनते समोर आणू**

कलम १६ अंतर्गत करण्यात आली होती. या कारवाईत अधिकाऱ्यांनी चांगले कर्तव्य बजावले मोठ्या प्रमाणात कागदपत्रे जप्त केली. या कारवाईत तब्बल ६५ लोकांच्या संपत्ती संदर्भातील व तत्सम कागदपत्र आढळून आली आहेत. यावरून मनोहर अडीतमल कृपलानी व दिनेश मनोहर कृपलानी याच्या अवैध सावकारीचा आवाका किती प्रचंड होता, हे स्पष्टपणे दिसून येते. कृपलानी याच्याकडे ज्या कर्जदारांची संपत्ती संबंधी कागदपत्रे सापडली आहेत, त्या सर्वांना आता २७ जून रोजी सुनावणीसाठी बोलावण्यात आलेले आहे. यापुढील काळात कृपलानी याचा हा अवैध सावकारीचा धंदा पूर्णपणे उद्ध्वस्त करावा व त्याच्यावर योग्य ती फौजदारी कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आता कर्जदारांकडून होते आहे.दैनिक जनसंचलन




व सिटी न्यूजच्या पाठपुराव्यामुळे ही कारवाई झाली असली, तरी यापुढील कायदेशीर कारवाई प्रामाणिकपणे व्हावी व कृपलानी याला कायद्यानुसार कठोर शिक्षा व्हावी, यादृष्टीनेही सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन सातत्याने प्रयत्न करीत राहणार आहे. आपली एक सामाजिक जबाबदारी म्हणून अवैध सावकारी रोखण्यासाठी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज याबाबत कार्यरत राहणार आहे.

अजून बरेच काही पुढील भागात...

# शेगावात पुरुषोत्तम नगर व भूतबंगला भागात चोरी करत दोन लाख रुपयांचा मुद्देमाल केला लंपास

**जनसंचलन/ शेगाव**

पंधरा दिवसापासून शेगाव शहर व ग्रामीण भागात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असतांना शहरातील पुरुषोत्तम नगर व भूत बंगला परिसरात पुन्हा एक घरफोडी झाल्याने शहरातील सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. पुरुषोत्तम नगरातील राहणार दिपक नानाराव ससाने यांचेकडे त्यांचा भाचा व भाची शिक्षणासाठी शेगाव येथे असल्याने त्यांचे शाळेची फी भरणे साठी १२ जून रोजी सायंकाळी ६ वा. त्यांची बहीण सौ. सिमा राहुल इंगळे व जावाइ राहुल श्रीकष्ण इंगळे. रा. वाडेगाव हिंगणा असे घरी आले व शाळेची फी भरण्याचे नगदी ४० हजार रु. फिचे आई नयनाबाई पळत जाताना दिसला. तेव्हा फीने घरातील लाख रुपयांचा मुद्देमाल लंपास नानाराव ससाने हीचे कडे दिले. ते पैसे तिने फिचे घराचे बेडरुम मधिल कपाटात ठेवले, व रात्री ११.५० वा. सर्व जेवण करुन फीचे घराचे सर्व दरवाजे बंद करुन घरात हॉल व आप आपले बेडरूम मध्ये झोपले असता. १३ जून रोजी सर्व झोपेत असताना रात्री ३.५० वा, फीचा भाचा संमेक राहुल इंगळे याचा चोर चोर असा आवाज आला. वरुन तेव्हा सर्वांनी उठुन पाहीले असता, फीला व फीचे घरचे सर्व मंडळीना एक अनोळखी इसम फीचे घराचे मांगिल दरवाज्याने कपाटात ठेवलेले. नगदी ४० हजार रु. व फिचे घरा शेजारी राहणारे कैलास श्रीराम सुलताने यांचे घरातील दोन भारत कंपनिचे सिलेंडर कि अंदाजे प्रत्येकी २ हजार ५०० रु. एकूण ५ हजार रुपये असा एकुण ४५ हजार रुपयाचाचा मुददेमाल कोणीतरी अज्ञात चोराने घरात प्रवेश करुन चोरुन नेला. याबाबत दिपक नानाराव ससाने यांनी शहर पोस्टेला फिर्याद दिली असता पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध अप क्र. ३३४/२०२४ कलम ३८०,४५७ भा.द.वि अन्वये गुन्हा दाखल केला आहे. विजयकुमार बद्रिदास अग्रवाल वय ७० वर्षे रा. भूतबंगला परिसर, हनुमान मंदिर शेगाव यांनी शहर पोलिसात फिर्याद दिली की, माझी पत्नी, मुलगा, मुलगी, मोठी मुलगी, जावई हे देवदर्शनासाठी गेले होते बाहेर गावी गेले असल्याने १२ ते १४ जूनच्या पहाटे पर्यंत अज्ञात चोरट्याने सोन्याची चैन १५.१९० ग्रॅम किंमत ३० हजार ८५० रुपये, लेडीज सोन्याची अंगठी अंदाजे ३. २ ग्रॅम किंमत ६ हजार ६५० रुपये, जेन्टस सोन्याची ५.१ ग्रॅम किंमत ७ हजार २०० रुपये, लेडीज सोन्याची अंगठी ३.४ ग्रॅम किंमत ४ हजार ८०० रुपये, चांदीचे चैन पट्ट्या ३९ ग्रॅम किंमत १ हजार ५५० रुपये, चांदीचा शिक्का १२ ग्रॅम किंमत ८५० रुपये, एक सोन्याची पोत ज्यामध्ये सोन्याचे मनी तसेच काळे मणी अस-



लेली वजन १३ ग्रॅम किंमत ५२ हजार रुपये, जुने ५ नग चांदीच्या वाट्या व २ चांदीचे ग्लास एकूण किंमत १० हजार रुपये, नगदी ४० हजार रुपये असा एकूण १ लाख ५३ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेला आहे. अशा तक्रारी वरून अज्ञात चोरट्या विरुद्ध कलम ३८०, ४५४, ४५७, भा. दं. वि. नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# क्षुल्लक कारणावरून चाकू मारला ४ जणांवर गुन्हा दाखल

जनसंचलन/ शेगाव

तुम्ही दादागिरी गा का करतो असे म्हणत क्षुल्लक कारणावरून शिवाजी दिनकर तांदळे वय २३ वर्ष यांना मारहाण करून डाव्या हातावर चाकू मारून जख्मी केल्याची घटना ११ जून रोजी रात्री ९ वा दरम्यान ग्राम आळसणा येथे घडली. याबाबत पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी की, शिवाजी दिनकर तांदळे वय २३वर्ष रा. आळसणा हे सुभाष पाटील यांचे घराजवळुन जात असतांना तेथे फिर्यादी यांना जगन्नाथ लांजुळकर रा. आळसणा,. सागर डांबरे रा. शेगांव, युवराज बेले रा. शेगांव, गौरव लांजुळकर रा. आळसणा हे भेटले व फिस म्हणाले की, तुगावात दादागीरी का करतो. असे म्हणून फिर्यादी यांचेशीवाद करून शिवीगाळ करून फिर्यादीस चापटा बुक्यांनी मारहाण केली व आरोपी क्र. १ याने फिर्यादीचे डावे हाताचे तळहातावर चाकुने मारून जख्म केले. तसेच तुमच्या समाजाचे गावात एकच घर आहे. तुम्ही गावात कशे काय राहता अशी धमकी दिली. शिवाजी दिनकर तांदळे यांनी त्यांचा खासगी रुग्णालयात उपचार करून १४ जून रोजी ग्रामीण पो स्टेला तोंडी रिपोर्ट दिल्याने तसेच फिर्यादी यांचे ११ जूनचे पोस्टेला प्राप्त वैद्यकीय प्रमाणपत्रा वरून आरोपी जगन्नाथ लांजुळकर रा. आळसणा, सागर डांबरे रा. शेगांव, युवराज बेले रा. शेगांव, गौरव लांजुळकर रा. आळसणा या चौघांविरूध्द अप. क्र. १६७/२०२४ कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ भादंवि अन्वये गुन्हे दाखल केले आहे.

# खामगावातील आयटी इंजिनिअरची २८ लाखाने ऑनलाईन फसवणूक...

जनसंचलन/ खामगाव

शहरातील घाटपुरी नाका भागात राहणाऱ्या एका आयटी इंजिनिअरची तब्बल २८ लाखाने फसवणुक झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी बुलढाणा सायबर पोस्टेला गुन्हा नोंदविण्यात आला आहे. स्थानिक घारपुरी नाका भागातील आर. के. संकूलमध्ये पेसर अभिषेक राहणारे आयटी इंजिनिअर अभिषेक अशोक कलंत्री (३५) यांना १२ जून रोजी कुणीतरी अज्ञात व्यक्तीने मोबाईलवर फोन केला व तुमचे डीएच एल सींस कंपनीमध्ये संशयास्पद पार्सल असल्याचे सांगितले. याबाबत तुम्ही मुंबई नार्कोटीक कंट्रोल ब्युरो विभागातः तक्रार करा असेही त्याने सांगितले तक्रार करण्यासाठी मोबाईल ॲपचा वापर करा असे सांगितले. त्याने सांगितल्याप्रमाणे कलंत्री यांनी सदर ॲप डाऊनलोड केले असता संबंधित अज्ञा-ताने या ॲपच्या आधारे कलंत्री यांना त्यांच्या मोबाईलची स्क्रीन शेअर करण्यास सांगितली व त्याने त्याद्वारे कलंत्री यांच्या मोबाईलचा ऑनलाईन ताबा घेवून त्या आधारे कलंत्री यांच्या बँक खात्यातून १८ लाख १५ हजार २४६ रुपये इतर खात्यात वळती केले. तसेच संबंधीत अज्ञात भामट्याने कलंत्री यांच्या क्रेडीट कार्डद्वारे १० लाख रुपयांचे लोन घेवून ते पैसे देखिल इतर खात्यात वळती केले. अशा पध्दतीने त्याने कलंत्री यांची तब्बल २८ लाख १५ हजार २४६ रुपयांनी ऑनलाईन फसवणूक केली. हा प्रकार लक्षात आल्यानंतर अभिषेक कलंत्री यांना धक्काच बसला. याबाबत त्यांनी बुलढाणा सायबर पो-लीस स्टेशनला तक्रार दिली असून यावरुन पोलिसांनी अज्ञाताविरुध्द कलम ४१९, ४२० भादंविनुसार गुन्हा दाखल केला आहे. सायबर पोलीस पुढील तपास करीत आहेत.




# अल्पवयीन चालक सुसाट पाच महिन्यांत अवघ्या ०३ कारवाई

## शहर पोलिसांचे दुर्लक्ष पुण्याच्या पोर्शे प्रकरणानंतरही कारवाई थंड

वृत्तसंस्था/पुणे

पुण्यातील अल्पवयीन चालकाचे पोर्शे कार हिट अँड रन प्रकरण राज्यभर गाजत असतानाच लोणार शहरात अल्पवयीन चालकांना मात्र मोकळे रान असल्याचे चित्र आहे. शहरभर अल्पवयीन चालक सु-साट गाड्या चालवत असताना शहर वाहतूक पोलिसांनी जानेवा-री ते मे या पाच महिन्यांत अवघ्या ०३ अल्पवयीन चालकांवर कारवाया केल्या. त्यामुळे आता तरी पोलिस, आरटीओ जागे होणार की नाही, असा सवाल उपस्थित केला जात आहे. वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्याशिवाय कोणतेही वाहन चालविण्याचा परव-ाना दिला जात नाही. तरीही अनेक अल्पवयीन मुले नियमांचे उल्लंघन करीत दुचाकी, कार चालवतात. पुण्यातील पोर्शे कार अपघात प्रकरणातील चालक हा अल्पवयीन निघाला. धक्कादायक म्हणजे, त्याने नशा केल्याचेही तपासात उघड झाले होते. त्यानंतर अल्पवयीन, मद्यपी चालकांवरील कारवाया राज्यभर



वाढविणे अपेक्षित होते. मात्र लोन-ारात वाहतूक पोलिसांनी मागील पाच महिन्यांमध्ये अवघ्या ०३ अल्पवयीन चालकांवर कारवाई केली आहे. अल्पवयीन चालकांवरील कारवायांचे प्रमाण अत्यल्प असल्यामुळे त्यांच्यावर कोणाचाही वचक नसल्याचे दिसते वाहतूक पोलिस केवळ ट्रीपलसीट आणि विनाहेल्मेट दुचाकीस्वारांचे फोटो काढून त्यांना ऑनलाइन चलन पाठविण्यातच धन्यता मानत आहेत. पाच महिन्यांत वाहतूक पोलिसांनी १७ विनाहेल्मेट दुचाकीस्वारांनावर तर २१२ ट्रीपलसीट दुचाकीस्वारांनावर ऑनलाइन दंड ठोठावल्याचे आकडेवारीवरून दिसते. पूर्वी वा-हतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना पोलिस थांबवायचे. त्यानंतर अनेकांना पोलिसांची धास्ती बसायची. मात्र आता पोलिसही केवळ मोबाइलमध्ये फोटो काढून ऑनलाइन चलन पाठवून मोकळे होतात. त्यामुळे रस्त्यावरील पोलिसांना फारसे कोणी जुमानत नसल्याचे दिसते.

मागील ५ महिन्यातील केसेस चा आकडा १)विना हेल्मेट १७ केसेस ,२) ट्रिपल सीट २१२ केसेस, ३) अल्पवयीन ३ केसेस, ४) ड्रंक अँड ड्राईव्ह निरंक

# अट्टल स्पींकलर (तोट्या) चोरणारे चोरटे पोलिसांच्या जाळ्यात

जनसंचलन/चिखली




मेहकर येथील बाजारात स्पींकलर (तोटया) विक्री करणाऱ्या आरोप-ीचा बाजारात शोध घेतला असता त्याना शिताफीने पकडून पो. स्टे. चिखली येथे आणून हजर केले असता त्यानी त्याचे नाव राकेश इंतु पवार रा. सुकळी ता. मेहकर, कन्हैया बनारस पवार रा. सुकळी ता. मेहकर, भास्कर इससिंग पवार रा. साकेगाव ता. चिखली, रविंद्र खंडु पवार रा. अंत्रीकोळी ता. चिखली, ज्योती रविंद्र पवार रा. अंत्रीकोळी ता. चिखला, आशाफुला नितीन पवार रा. अंत्रीकोळी ता. चिखली यांना गुन्हयासंदर्भाने विचार पुस केली असता तसेच त्याना विश्वासात घेवून विचारपुस केली असता त्यानी पो-लीस स्टेशन चिखली हददीतील अजून चोऱ्या केल्याची कबुली दिली. तसेच सदरचा माल आम्ही मेहकर येथील एका व्यापाऱ्याला विकत असल्याची माहिती दिली वरुन राकेश इंतु पवार रा. सुकळी, ता. मेहकर यास ताब्यात घेवुन मेहकर येथील व्यापारी रमेश अनंतराव मैंद याचे दुकानाची झडती घेतली असता त्याचे दुकानामध्ये स्पींकलर (तोटया) चा माल मिळून आला असता सदर मालाबाबत विचारपुस केली असता तो माल राकेश पवार यांने दिला आहे. असे कबुली दिल्याने व्यापारी रमेश अनंतराव मैंद याना ताब्यात घेवून गुन्हयात सर्व आरोपीना अटक करण्यात आली असून इतर गुन्हे केले आहेत की, कसे बाबत वि.न्यायालयामध्ये हजर करुन पीसीआर घेण्यात येत असून पढील तपास पोहेकॉ विकास देशमुख पोका संतोष जाधव करीत आहे. यावेळी ३७१०० रुपये किमतीचे १०६ स्प्रिंकलर (तोटिया), स्प्रिंकलरचे २० तुकडे, आरोपी यांनी गुन्ह्यात तोटया) चे तुकडे केलेलेभंगारकि. अं. ६००० रु. वापरलेल्या चार मोटरसायकल किं. अं १२०००० रु., आरोपीच्या ताब्यातून तीन मोबाईल कि अं २२००० रु. असा एकुण १,८५,१०० रु. चा मुद्देमाल आरोपी १ ते ७ कडून हस्तगत करण्यात आलेला आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# ५० खेडी जोडल्या गेलेल्या देऊळगावमही मध्ये प्रवासी निवारा नसल्याने प्रवाश्यांची गैरसोय...

## १५ दिवसात प्रवाशी निवाऱ्याचा प्रश्न मार्गी लावा अन्यथा भाजपा च्या वतीने आंदोलन...

**जनसंचलन/बुलडाणा**

देऊळगावराजा तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत असलेल्या देऊळगावमही हे गाव खामगाव जालना महामार्गावर अस्तित्वात आहे... या गावाला ५० खेडी जोडल्या गेली असून ऐतिहासिक बाजार पेठ आहे मात्र या ठिकाणी प्रवाशी निवारा नसल्याने प्रवाश्यांची मोठी गैरसोय होताना दिसते आहे... या संदर्भात आमदार डॉक्टर राजेंद्र शिंगणे यांच्याकडे कित्येक वर्षापासून ग्रामस्थानी मागणी केली आहे अद्याप पर्यंत ही मागणी पूर्ण केल्या गेली नाही त्यामुळे भाजपाच्या वतीने जिल्हा प्रशासन व आ शिंगणे यांना निवेदन देण्यात आले आहे.. १५ दिवसात प्रवाशी निवाऱ्याचा प्रश्न मार्गी लावला नाही तर देऊळगावमही भाजपा च्या



वतीने रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यात येईल असा इशारा भाजपचे नेते कैलास राऊत यांनी दिला आहे

# १९ वर्षांची मुलगी बेपत्ता...

**जनसंचलन/ खामगाव**

मंदिरात आरतीला जाते असे सांगून गेलेली १९ वर्षीय तरुणी बेपत्ता झाल्याची घटना स्थानिक घाटपुरी रोडवरील पाण्याच्या टाकीजवळील सुंदर नगर भागात घडली.येथील कु. भाग्यश्री ज्ञानदेव भोरे ही १४ जून रोजी सायंकाळी गजानन महाराज मंदिरात आरतीला जाते असे सांगून घरुन गेली मात्र घरी परत आलीच नाही. यामुळे कुटुंबियांनी तिचा सर्वत्र शोध




घेतला. पण ती मिळून आली नाही. यामुळे याबाबत तिच्या वडिलांनी शिवाजी नगर पोस्टेला तक्रार दिली असून यावरुन पोलिसांनी हरविल्याची नोंद केली आहे.

# विकासाला चालना मिळण्याची अपेक्षा

**जनसंचलन/ जळगाव जामोद**

वैनगंगा व नळगंगा नदीजोड प्रकल्प हा पूर्णत्वाला नेणे, तसेच जिल्ह्यातील सोयाबीन आणि कापूस या पिकांवर प्रक्रिया करून औद्योगिक क्षेत्राची उभारणी व विस्तार करण्याचा संकल्प निवडणुकीच्या वेळी महायुतीचे उमेदवार प्रतापराव जाधव यांनी केला होता. तो आता तडीस जावा, अशी अपेक्षा जिल्हावासीयांमध्ये आहे. जिल्ह्यातील तरुणांसाठी नवीन रोजगार निर्मिती व कौशल्यावर आधारित उद्योगाची निर्मिती करणे, महिला सक्षमीकरणासाठी बचत गटाच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी करणे व लखपती दीदी करणे व प्रत्येक गावातील ग्रामसंघांना बचत गट भवन बांधून देणे, याबाबी ही संकल्पाचा भाग होता. त्यानंतर आता ना. जाधव यांना भारत सरकारचे आयुष, कुटुंब कल्याण व आरोग्य राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) झाले आहेत.

# घराच्या किचनचे ग्रील कापून ३ लाखाचा ऐवज लंपास

## शेगाव रोडवरील व्यंकटेश नगरातील घटना



**जनसंचलन/ शेगाव**

स्थानिक शेगाव रोडवरील व्यंकटेश सिटी परिसरातील एका घराच्या किचनचे ग्रील कापून चोरट्यांनी घरातील सोन्या चांदीच्या दागीन्यांसह अंदाजे तीन लाखांचा मुद्देमाल लंपास केला. ही घटना १४ जून रोजी सकाळी उघडकीस आली. घटनेची माहिती मिळताच शहर पोलीस स्टेशनचे पथक घटनास्थळी दाखल झाले होते. याबाबत प्राप्त माहितीनुसार, शेगाव रोडवरील व्यंकटेश सिटीमध्ये उद्योजक शिवशंकर लगर यांचे दुमजली घरआहे. लगर हे कामानिमित्त पुणे येथे गेलेले होते. त्यांच्या घरी केवळ त्यांचे सासू सासरे होते. दरम्यान मध्यरात्री चोरट्यांनी लगर यांच्या घराच्या किचनच्या खिडकीचे ग्रील कापून सुरुवातीला किचनमध्ये आणि त्यानंतर दुसऱ्या मजल्यावरील लॉकररूममध्ये प्रवेश केला. पेचकच आणि इतर साहित्याचा वापर करून त्यांनी लॉकर मधील सोन्या-चांदीच्यादागीन्यांसह तीन लाखांचा ऐवज लंपास केला. घरातील साहित्य चोरी केल्यानंतर चोरट्यांनी घरातील चाबी घेऊन लगर यांची घरा समोर उभी केलेली बलेनो कार घेऊन चोरटे पसार झाले. ही घटना शुक्रवारी उघडकीस आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार प्रवीण नाचनकर, पीएसआय निलेश लबडे, पोहेकॉ गजानन बोरसे, नापोकॉ रविंद्रकन्नर, सागर भगत, संतोष गायकवाड, चालक संजीव धंदरे, गजानन काळे यांनी घटनास्थळाची पाहणी केली. तसेच फिंगर प्रिंट व डॉग स्कॉट पथक घटनास्थळी दाखल झाले होते. यावेळी पोलिसांनी स्थळ निरिक्षण आणि पंचनामा केला. उपविभागीय पोलीस अधिकारी विनोद ठाकरे यांनीही आपल्या पथकासह घटनास्थळी भेट दिली. याप्रकरणी विजय माधवराव पाटील रा. श्रध्दा सोसायटी जि. सुरत गुजरात यांनी दिलेल्या तक्रारीवरून शहर पोलिसांनी अज्ञात चोरटयाविरोधात भादंवि ४५७, ३८० नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# मुरादपूरच्या प्रकरणात शेतकऱ्यावर गुन्हा दाखल

## विजेचा शॉक लागून पिता-पुत्राचा झाला होता मृत्य

**जनसंचलन/ चिखली**



चिखली तालुक्यातील मुरादपूर शेतशिवारात विजेच्या धक्क्याने मेरा बु, येथील रामेश्वर पडघान व वैभव पडघान या पिता-पुत्राचा १३ जून रोजी मृत्यू झाला होता. मुरादपूर येथील शेतकऱ्याने या पिता-पुत्रास शेतातील लाईनचे काम करण्यासाठी बोलाविले होते. दरम्यान, याबाबत महावितरणला कुठलीही सूचना किंवा माहिती न दिल्याने दोघांना जीव गमवावा लागल्याचा आरोप मुरादपूर येथील शेतकरी समाधान गाडेकर यांच्यावर असून, याप्रकरणी महावितरणचे कनिष्ठ अभियंता आदित्य पडघान यांनी अंढेरा पोलिसांत दिलेल्या तक्रारीवरून समाधान गाडेकर याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यांच्या शेत शिवारातील विजेच्या तारा खाली लोंबकळल्या होत्या. शेतीची कामे करताना त्यांना त्रास होऊ नये यासाठी त्यांनी तातडीने लाईनचे काम करायचे ठरवले. खासगी वायरमन बोलावून काम करवून घेण्याचे त्यांनी ठरविले व त्यानुषंगाने रामेश्वर उत्तमराव पडघान व वैभव रामेश्वर पडघान या दोघा पिता-पुत्रास बोलावून घेतले. दरम्यान, लाईनचे काम करत असताना दोघांनाही विजेचा तीव्र झटका लागला. यात दोघांचा मृत्यू झाला. ही बाब महावितरणला कळाल्यानंतर शेतातील लाईनचे काम करण्यापूर्वी समाधान गाडेकर याने महावितरणला कळविले नसल्याचे स्पष्ट झाल्याने १४ जून रोजी समाधान गाडेकर विरोधात तक्रार देण्यात आली आहे. यावरून पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# निवृत्तीवय साठ वर्षे करण्यावर मुख्यमंत्री सकारात्मक,मागण्यांची पूर्तता लवकर करण्याचे दिले आश्वासन...

वृत्तसंस्था/मुंबई

अनुभवी अधिकारी-कर्मचाऱ्यांचा प्रशासनाला अधिक उपयोग व्हावा, या उद्देशाने राज्य सरकारने सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करावे, या मागणीवर मुख्य सचिवांप्रमाणेच मुख्यमंत्र्यांनीही सकारात्मक दृष्टिकोन व्यक्त केला आहे. सह्याद्री अतिथिगृहावर झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मागण्यांची पूर्तता लवकरच होईल, असे आश्वासन दिल्याचे महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाने स्पष्ट केले.प्रलंबित मागण्यांबाबत निर्णय होण्यासाठी अधिकारी महासंघाने आग्रही भूमिका घेतली आहे. त्यास अनुसरून १० जून रोजी मुख्य सचिवांसोबत, तर १४ जून रोजी मुख्यमंत्री शिंदे यांच्या समवेत महासंघाची महत्त्वपूर्ण बैठक झाली. केंद्र आणि २५ राज्यांप्रमाणे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करण्याबाबतची फाइल मुख्यमंत्र्यांकडे निर्णयासाठी सादर झाली आहे. अनुभवी अधिकारी-कर्मचाऱ्यांचा प्रशासनाला अधिक उपयोग व्हावा, या उद्देशाने राज्य सरकारने सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करावे, या महासंघाच्या मागणीवर मुख्य सचिवांप्रमाणेच मुख्यमंत्र्यांनीही सकारात्मक दृष्टिकोन व्यक्त केला आहे, अशी माहिती महासंघातर्फे देण्यात आली.केंद्र सरकारने आपल्या कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ४६ वरून ५० टक्के केला आहे. याबाबतचा प्रस्ताव राज्याच्या वित्त विभागाच्या अपर मुख्य सचिवांनी तयार केला आहे, तो सरकारने तत्परतेने मंजूर करावी, अशी मागणी महासंघाने या बैठकांमध्ये केली आहे. सरकारच्या सहकार्याने आणि आर्थिक मदतीने महासंघाचे कल्याण केंद्र उभारणीचे काम गतीने सुरू आहे. त्यासाठी अतिरिक्त निधी देण्याचा मानस मुख्य सचिव आणि



मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला असून ही स्वागतार्ह बाब आहे, असेही महासंघाचे मुख्य सल्लागार ग. दि. कुलथे यांनी सांगितले.

# बुलढाणा पोलीस शिपाई भरती प्रक्रिया १९ जूनपासून सुरू होणार

जनसंचलन/बुलढाणा

पोलिस शिपाई करिता शारिरीक मोजमाप चाचणी/मैदानी चाचणी ही १९ जून ते ५ जुलै या कालावधीत होणार असून पोलीस शिपाई (बॅण्डस्मन) पदाकरीता शारिरीक मोजमाप चाचणी/मैदानी चाचणी ही २ ते ३ जुलै या कालावधीत होणार आहे. शारीरिक मोजमाप व मैदानी चाचणीकरिता सुरुवातीचे २ दिवसांमध्ये ५०० व उर्वरित दिवसांमध्ये ८०० प्रमाणे उमेदवार दररोज उपस्थित राहणार असुन उमेदवारांनी मुळ आवेदन अर्ज, मुळ प्रवेश पत्र, आवेदन अर्ज भरतानांचे ३ पासपोर्ट फोटो, स्वतःची ओळख पटविण्यासाठी (अ) मुळ आधार कार्ड (ब) ड्मतदान ओळखपत्र (क) वाहन परवाना / पॅनकार्ड या कागदपत्रासह पोलीस मुख्यालयाचे मैदानावर हजर रहावे. तसेच उमेदवारांनी देखील त्यांचे शैक्षणिक इ. कागदपत्रे सुस्थितीत आक्षेप व इतर अडीअडचणीचे अनुषंगाने भरती सक्षम प्राधिकारी/ अपीलीय अधिकारी यांचेकडुन वेळीच निरसन करण्यात येईल. तसेच दैनिक मैदानी चाचणीचे निकालपत्र माहिती नमुद केली आहे त्याच आधारे दररोज मुख्यालयाचे सुचना फलकावर व जिल्हा पोलीस दलाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. जाहिरातीत नमुद केल्याप्रमाणे उमेदवारांचे प्राथमिक कागदपत्राची तपासणी करण्यात येणार असून अंतिम निवड झालेल्या उमेदवारांची मुळ कागदपत्र फेर तपासणी करण्यात येणार आहे. सदर फेर तपासणीमध्ये शैक्षणिक कागदपत्रे, इतर प्रमाणपत्र खोटी, मुदतबाह्य अथवा चुकीची आढळुन आल्यास उमेदवाराला भरतीच्या कोणत्याही टप्यावर बाद करण्यात येईल, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. सदर पोलीस शिपाई पद भरतीचे सदर भरती प्रक्रिया ही तटस्थपणे, निःपक्षपातीपणे व पारदर्शक होणे करीता मैदानावर व मैदानाच्या परीसरामध्ये ठिकठिकाणी सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्यात आले असुन पद भरतीच्या प्रत्येक टप्यावर उमेदवारांची व्हीडीओ शुटींग / सीसीटिव्हीचे चित्रीकरण होणार आहे. उमेदवारांनी कोणतेही उपकरण सोबत ठेवु नये व कोणताही गैरप्रकार (डमी उमेदवार उभा करणे इत्यादी) होणार नाही याची दक्षता घ्यावी. सदर बाब भरती प्रक्रिये दरम्यान निदर्शनास आल्यास संबंधीत उमेदवाराला भरती प्रक्रियेमधुन



बाद करुन त्याचे विरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल याबाबत कालावधीत जिल्हा पोलीस दलातील गोपनिय यंत्रणा कार्यान्वीत राहणार असून उमेदवारांनी कोणचाही प्रलोभन / आमिषास बळी पडू नये व कोणताही गैरप्रकार होत असल्याचे निर्दशनास आल्यास त्याबाबतची माहिती प्रत्यक्ष अवगत करुन द्यावी, असे आवाहन पोलीस प्रशासनाचे वतीने करण्यात येत आहे.

# अपघाताला निमंत्रण देणारा खड्डा बुजवून माणूसकीचे दर्शन

जनसंचलन/बुलढाणा

अपघात कधीच जात, पात, धर्म, वेळ, काळ बघत नसतो. बुलडाणा समृध्दीवरील अपघात हा बुलडाणेकरांना न विसरता येणारा आहे. अपघातामध्ये हानी ही निश्चीत आलीच. याची जाणीव ठेवून मानसेवी विशेष पोलिस अधिकारी प्रभाकर वाघमारे यांनी अशाच एका अपघाताला निमंत्रण देणारा खड्डा बुजवून माणुसकीचे दर्शन घडविले आहे. शनिवार १५ जून रोजी सायकांळी तुफान पाऊस चालु असतांना बुलडाणा चिखली रोडवरील येळगाव पुल या ठिकाणावरुन येतांना एका परिवारासह येणाऱ्या टु-व्हिलर चालकाला पुलाजवळील वळणावर असलेला खड्डा पाणी साचले असल्याने कळाला नाही व त्यामुळे तोल जावून गाडी स्लीप झाली.यात त्यांचा परिवार किरकोळ जखमी झाला. सदर घटना याचवेळी मागून येणारे मानसेवी विशेष पोलिस अधिकारी प्रभाकर वाघमारे यांनी बघितली. यावर खड्डा जरी छोटा असला-तरी त्यामुळे एखादी मोठी जिवीतहानी होवू शकते.. असा विचार करत त्यांनी आज १६ जून रोजी आपले काही सहकारी गजानन सरकटे, ऋषीकेश वानखेडे व शेळके यांना सोबत घेत तो खड्डा सिमेंट



व गिट्टी टाकून बुजवून टाकला. अशाचप्रकारे अपघाताला निमंत्रण देणारे खड्डे बुजविल्यास वाढते अपघात कमी होण्यास निश्चीत मदत होईल, असा आशा प्रभाकर वाघमारे यांनी यावेळी व्यक्त केली.

# वर्णा येथील शेतकऱ्याची २ लाखाने फसवणूक

जनसंचलन/ खामगाव

उधारीवर नेलेल्या कच्च्या केळींचे दोन लाख रुपये देण्यास व्यापारी टाळाटाळ करीत असल्याची घटना तालुक्यातील वर्णा येथे उघडकीस आली आहे. याप्रकरणी फसवणूक झालेले शालिग्राम रतनसिंग चव्हाण (५८) यांच्या तक्रारीवरून जळगाव खान्देश जिल्ह्यातील दोन व्यापाऱ्यांविरुद्ध हिवरखेड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याबाबत शालिग्राम चव्हाण यांनी हिवरखेड पोस्टेला तक्रार दिली की, सारोळा परिसरात त्यांची केळीची बाग असून काही दिवसापूर्वी विनोद मोहन बावस्कर (४२) व संदीप मधुकर महाजन (४२) दोन्ही रा. सिगनुर ता. रावेर जिल्हा जळगाव खान्देश हे कच्ची केळी घेण्याकरिता त्यांच्या




शेतात आले. त्यांनी केळीच्या बागेतून कच्ची केळी मोजून घेतली व चव्हाण यांना १ लाख ५० हजार रुपये दिले व उर्वरित २ लाख २ हजार दुसऱ्या दिवशी आणून देतो, असे सांगून ते दोघे केळी घेऊन निघून गेले. मात्र ते दोघे उर्वरित पैसे देण्यास टाळाटाळ करीत आहेत. या तक्रारीवरून हिवरखेड पोलिसांनी बिनोद मोहन बावस्कर व संदीप मधुकर महाजन या दोघांविरुद्ध कलम ४२०, ३४ भादंवीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.